**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

# 'सर्वांना सोबत घेऊन शहराचा विकास साधाणार...' —मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. राधाबिनोद अ. शर्मा यांचा सुतोवाच

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांच्या अध्यक्षतेखाली दि. ८.०४.२०२५ रोजी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये शहरातील समाज कल्याण विशेष करून दिव्यांगांच्या प्रश्नांवर जास्त भर देणे, नागरिकांचे जलजीवन सुधारणे तसेच आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने काम करण्याबाबत निर्देश प्राप्त झाले. त्याअनुषंगाने महानगरपालिका मुख्यालयातील मा. स्थायी समिती सभागृहात मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद घेण्यात आली.

समाज कल्याणाच्या दृष्टीने शहरातील दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षण करण्यात येणार असून त्यांना महानगरपालिकेमार्फत सुविधा देण्याकरीता उपाययोजना राबविण्यात येणार आहे. मनपाच्या आस्थापनेवरील अनुकंपा तत्वाच्या प्रकरणांमधील दिव्यांगांच्या प्रकरणांना प्रधान्य देण्याच्या सूचना आस्थापना विभागाला देण्यात आले.

महराष्ट्र शासन, फिट इंडिया मुव्हमेंटच्या धर्तीवर महाराष्ट्रात फिट महाराष्ट्र चळवळ राबवित आहे. ज्याचा उद्देश महाराष्ट्रातील लोकांमध्ये निरोगी जीवनशैली, व्यायामाचे महत्तव आणि आरोग्यविषयक जागरूकता वाढविणे तसेच तंदरूस्त आणि निरोगी महाराष्ट्र घडवणे आहे. यासाठी मिरा भाईंदर शहरातील उद्यानांमध्ये हॅरीटेज वॉक सारखे उपक्रम राबविण्यात येईल व याच प्रकारचे विविध व्यायामाचे उपक्रम या उद्यानात राबविण्यात येतील. जेणेकरून व्यायामाची सवय नागरिकांना लागेल आणि नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण होईल हा या मागचा मुख्य उद्देश आहे. शहरातील नागरिकांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने आरोग्य यंत्रणेत सुधारणात्मक पाऊले टाकून त्याप्रमाणे विकास करण्यात येईल. नागरिकांमध्ये भारतीय संविधानाप्रती जागरूकता यावी यासाठी "घरो घरी संविधान" हा उपक्रम राबविण्याबाबत निर्देश प्राप्त झाले आहे. त्यास अनूसरून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यालये, शाळा, इ. आस्थापनांमध्ये दर्शनी भागात संविधानाची प्रस्तावना लावण्यात येणार आहे. शहरात हा उपक्रम राबविण्याच्या हेतून लवकरच मोहिम देखील आखण्यात येणार आहे.

तसेच शहरातील प्रदुषण नियंत्रित करण्याच्या दृष्टीकोनातून प्रत्येक नागरिकांनी प्रत्यक्ष योगदान द्यावे. पर्यावरणाप्रती संवेदनशील बनावे या हेतूने शहरातील नागरिकांनी "घरो घरी नर्सरी" उभे करण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी केले. यामाध्यमातून नागरिकांनी स्वत: आपल्या घरात रोप तयार करून ते रोप शहरातील परिसरात लावणे अपेक्षित आहे.

उपस्थित संपादक/पत्रकार व प्रतिनिधींसोबत शहरातील विविध विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. **'सर्वांना सोबत घेऊन गेल्यास दूरचा पल्ला गाठता येतो' असे म्हणत सर्वांना सोबत घेऊन शहराचा व्यवस्थापन व विकास साधणार असल्याचा सुतोवाच मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी या प्रसंगी केले.** पत्रकार हे समाजातील महत्वाच्या घटकांपैकी एक घटक असल्याने त्यांच्यासोबत संवाद साधून विचार विनिमय करता आल्याने मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. राधाबिनोद अ. शर्मा यांनी आनंद व्यक्त केला. पत्रकारांसोबत संवाद साधून त्यांच्या समवेत विचार विनिमय केल्याने उपस्थित पत्रकारांनी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे आभार मानले.